# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्राप्त दरांना प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील ३० एम.एल.डी. मलप्रक्रिया केंद्राचे काम भुयारी गटार योजना टप्पा-२ अंतर्गत पुर्ण झालेले असुन मलशुद्धीकरण केंद्र प्राथमिक टप्प्यात कार्यान्वित करण्यांत आलेले आहे. तसेच ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपीग स्टेशन कार्यान्वित आहेत.

सद्यस्थितीत भुयारी गटार योजना टप्पा-२ चे ठेकेदार मे. ईगल इन्फ्रा. इंडीया लि. यांचे कडुन ट्रायल अॅण्ड रन तत्वावर काम करुन घेण्यांत येत होते. परंतु त्याची मुदत ६ महिने असुन ती संपलेली आहे.

सदरचे मलशुद्धीकरण केंद्र १ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून कार्यान्वित आहे. सदर मलशुद्धीकरण केंद्र चालविणे करीता मनपा आस्थापनेवर सदर बाबतचे तांत्रिक ज्ञान असलेले कर्मचारी उपलब्ध नाहीत. मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित ठेवणे कामी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे वेळोवेळी मलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित आहे किंवा नाही याबाबत पहाणी होत असते. तसेच मलशुद्धीकरण कार्यान्वित नसल्याचे आढळल्यास त्यांचे कडुन दंडात्मक व फौजदारी स्वरुपाची कारवाई होऊ शकते. त्याकरीता मनुष्यबळासहित देखभाल, निगा व दुरुस्ती करणेचे काम अत्यावश्यक आहे.

तसेच भिवंडी महानगरपालिकेच्या शेजारी असणाऱ्या महानगरपालिकांकडून माहिती घेतली असता सदर महानगरपालिकांच्या क्लोरिनेशन प्लॅन्टची निगा, दुरुस्ती व वार्षिक देखभाल खाजगी ठेकेदारांमार्फत काम करण्यात येत आहे.

उपरोक्त कामाकरीता ₹१,१९,१३,५४४/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन प्रशासकिय ठराव क्र. ३४७, दि.०९/०२/२०२४ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार दै.वृत्तपत्रात तसचे महा-ई-टेंडर्स या संकेतस्थळावर तिसऱ्यांदा प्रसिद्ध करुन (१२ महिन्यांकरीता) ई-निविदा मागविण्यात आली असता एकुण सहा निविदा प्राप्त झाल्या आहे. सदर निविदेच्या छाननी प्रक्रियेत तीन निविदा कागदपत्रांची पुर्तता न झाल्यामुळे अपात्र ठरविण्यांत आल्या असुन पात्र निविदाकारांचा तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. ओम इंडस्ट्रीयल इंजि. सर्व्हि. | - | अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १.३०% कमी दराने |
| २. | मे. ग्लोबल इन्वायरो | - | अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १.००% जास्त दराने |
| **३.** | **मे. ए.आर.डब्ल्यु. इन्फ्रा. प्रोजे. प्रा. लि.** | **-** | **अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.१०% कमी दराने** |

वरील प्राप्त दरांपैकी **मे. ए.आर.डब्ल्यु. इन्फ्रा. प्रोजे. प्रा. लि.** यांची निविदा सर्वात कमी दरांचे म्हणजेच अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.१०% कमी दरांची रक्कम रु.१,१६,६३,२८७/- मात्रची प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेतील प्राप्त दर |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या प्राप्त दरांना प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.** | **रु.१,१६,६३,२८७/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या (१२ महिन्यांकरीता) कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असुन मे. ए.आर.डब्ल्यु. इन्फ्रा. प्रोजे. प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.१०% कमी दरांची निविदा रक्कम रु.१,१६,६३,२८७/- मात्रच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४२० **दिनांक :** ९५/०३/ **२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या (१२ महिन्यांकरीता) प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता भिवंडी महानगरपालिका हद्दीत ३० एम.एल.डी. क्षमतेचे इदगाह स्लॉटर हाऊस येथील मलप्रक्रिया केंद्र व ब्राम्हणआळी, टावरे कंपाऊंड येथील पंपींग स्टेशनची वार्षिक देखभाल, निगा व दुरुस्ती करणे बाबतच्या (१२ महिन्यांकरीता) मे. ए.आर.डब्ल्यु. इन्फ्रा. प्रोजे. प्रा. लि. यांची अंदाजपत्रकीय दरांपेक्षा २.१०% कमी दरांची निविदा रक्कम **रु.१,१६,६३,२८७/-** मात्रच्या प्राप्त दरांना प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत १) गौतम कंपाऊंड नवीवस्ती (२५ एम.एल.डी.), शांतीनगर (१५ एम.एल.डी.), पोगांव (२ एम.एल.डी.), नुरीनगर (२ एम.एल.डी.), आझाद नगर (२ एम.एल.डी.) व वऱ्हाळदेवी (५ एम.एल.डी.) असे एकुण ६ क्लोरीनेशन प्लॅन्ट आहेत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे गौतम कंपाऊंड नविवस्ती येथील क्लोरिनेशन प्लॅन्ट मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा जलवाहिनी मधून येणाऱ्या २५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला १.५ पी.पी.एम. क्लोरिनची मात्रा देण्यात येत होती. गौतम कंपाऊंड नविवस्ती येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेची जुनी जलवाहिनी खराब झाल्यामुळे सदर जुनी जलवाहिनी बंद करुन दुसऱ्या नविन जलजोडणी देण्यांत आली आहे. परंतु नवीन जलवाहिनी मधून होणाऱ्या पाणी पुरवठ्याला क्लोरीनची मात्रा निरंक येत असून सदर पाणी पुरवठा भिवंडी शहरांत वितरीत झाल्यास जलजन्य आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर पिण्याच्या पाण्याला क्लोरीनची ५ पी.पी.एम. पर्यंत क्लोरीन गॅसची मात्रा देणे जरुरीचे आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे नव्याने बांधण्यात आलेले क्लोरीनेशन प्लॅन्ट कार्यान्वित करण्यांत आलेले आहेत. सदर क्लोरीनेशन प्लॅन्टमध्ये २) शांतीनगर - १५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ३) पोगांव - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ४) नुरीनगर - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ५) आझाद नगर - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा ६) वऱ्हाळदेवी - ५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला ५ पी.पी.एम. ची मात्रा देण्यात येते.

भिवंडी शहरातील नागरीकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करणे कामी सदर सर्व क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये सन २०२४-२५ या वर्षाकरीता १) गौतम कंपाऊंड नविवस्ती - १८२ क्लोरीन गॅस सिलेंडर, २) शांतीनगर - ९१ क्लोरीन गॅस सिलेंडर, ३) पोगांव - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर, ४) नुरीनगर - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर, ५) आझाद नगर - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर व ६) वऱ्हाळदेवी - ९१ क्लोरीन गॅस सिलेंडर असे एकुण ५८३ क्लोरीन गॅस सिलेंडरची आवश्यकता आहे.

त्याकरीता खुल्याबाजारातुन दर प्राप्त करुन प्राप्त किमान दरांपैकी १०० किलो क्लोरीन गॅस सिलेंडर सर्व करांसहित प्रति नग ₹८४००/- याप्रमाणे सर्वांत कमी दराचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सदर कामाकरीता ₹४८,९७,२००/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | रु.४८,९७,२००/- |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाच्या (बारा महिन्यांकरीता) प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणे कामी व पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ४१८ **दिनांक :** १५/०३/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ₹४८,९७,२००/- मात्रच्या प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२४-२०२५ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या (बारा महिन्यांकरीता) ₹४८,९७,२००/- मात्रच्या प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

## विद्युत विभाग

**प्रस्तावना**

**प्रति:- मा.प्रशासक तथा आयुक्त्,भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**विषय:- मनपा प्रभाग समिती क्रमांक 5 मंडई, भिवंडी नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. हॉस्पीटल इमारती मध्ये 2 नग उव्दवाहन व्यवस्था करणे.(सुधारित अंदाजपत्रक)**

महानगरपालिकेने राष्ट्रीय नागरी आरोग्य् अभियान अतंर्गत मंजुर अनुदानातून मंडई भिवंडी येथे बी.जी.पी. हॉस्पिटल G+2 मजल्याचे बांधकाम करुन बी.जी.पी. हॉस्पीटल करिता इमारत तयार करण्यात येत आहे. अभियाना अतंर्गत मंजुर निधीतून इमारतीचे बांधकाम, व विद्युतीकरण पूर्ण झालेले आहे व फायर फायटींग इत्यादी कामे प्रगती पथावर आहेत. सदर हॉस्पिटल करता राष्ट्रीय नागरी आरोग्य् अभियान अतंर्गत सन 2014-15 मध्ये इमारतीच्या बांधकाम, विद्युतीकरण कामाकरिता मंजूर 5 कोटी निधी मंजुर होता. त्यानुसार कामे पुर्ण झाली असून इमारतीला उदवाहन बसविणे कामा करिता निधी उपलब्ध नसल्यामुळे मनपा निधी मधून सदरची कामे करणे करिता सन 2023-24 च्या अर्थसंकल्पामध्ये उदवाहने बसविणे कामी रुपये 50 लाख तरतुद मंजुर करण्यात आलेली आहे. बी.जी.पी. हास्पीटल इमारतीमध्ये 2 नग लिप-ट बसविणेकामी सन 2023-24 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार सदर कामी सी.एस.आर. दर 2022-23 नुसार अंदाजपत्रक तयार केले असता रक्क्म रूपये 47,00,000/- एवढा खर्च अपेक्षित असून त्यास ठराव क्रमांक 280 दिनांक 25/10/2023 नुसार मंजूरी दिलेली होती. परंतु तदनंतर अंदाजपत्रक तपासले असता नजरचुकीने ॲडिशनल प्-लोअर COST अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने तो ITEM समाविष्ट करण्यात येवून सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 54,68,592/- प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यावरील कार्यकारी अभियंता(विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी, मा.अतिरीक्त आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीस मा. आयुक्त् सो. यांनी मान्य्ता दिलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 अ च्या (1 अ ) तरतुदी नुसार अधिकार मा. आयुक्त् तथा प्रशासक यांना आहेत. त्यानुसार वरिल प्रमाणे प्रस्ताव प्रशासकिय ठरावाच्या मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे. तरी मान्य्ता मिळावी.

**( सुरेश भट )**
**शहर अभियंता**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी
## विद्युत विभाग

**विषय:- मनपा प्रभाग समिती क्रमांक 5 मंडई, भिवंडी नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. हॉस्पीटल इमारती मध्ये 2 नग उव्दवाहन व्यवस्था करणे.(सुधारित अंदाजपत्रक)**

**प्रस्तावना**

महानगरपालिकेने राष्ट्रीय नागरी आरोग्‌ अभियान अतंर्गत मंजुर अनुदानातून मंडई भिवंडी येथे बी.जी.पी. हॉस्पिटल G+2 मजल्याचे बांधकाम करुन बी.जी.पी. हॉस्पीटल करिता इमारत तयार करण्यात येत आहे. अभियाना अतंर्गत मंजुर निधीतून इमारतीचे बांधकाम, व विद्युतीकरण पूर्ण झालेले आहे व फायर फायटींग इत्यादी कामे प्रगती पथावर आहेत. सदर हॉस्पिट्ल करता राष्ट्रीय नागरी आरोग्‌ अभियान अतंर्गत सन 2014-15 मध्ये इमारतीच्या बांधकाम, विद्युतीकरण कामाकरिता मंजूर 5 कोटी निधी मंजुर होता. त्यानुसार कामे पुर्ण झाली असून इमारतीला उदवाहन बसविणे कामा करिता निधी उपलब्ध नसल्यामुळे मनपा निधी मधून सदरची कामे करणे करिता सन 2023-24 च्या अर्थसंकल्पामध्ये उदवाहने बसविणे कामी रुपये 50 लाख तरतुद मंजुर करण्यात आलेली आहे. बी.जी.पी. हास्पीटल इमारतीमध्ये 2 नग लिप-ट बसविणेकामी सन 2023-24 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार सदर कामी सी.एस.आर. दर 2022-23 नुसार अंदाजपत्रक तयार केले असता रक्कम रूपये 47,00,000/- एवढा खर्च अपेक्षित असून त्यास ठराव क्रमांक 280 दिनांक 25/10/2023 नुसार मंजूरी दिलेली होती. परंतु तदनंतर अंदाजपत्रक तपासले असता नजरचुकीने ॲडिशनल प्‌-लोअर COST अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने तो ITEM समाविष्ट करण्यात येवून सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये 54,68,592/- प्रस्तावास मा.आयुक्त्‌ सो. यांनी दिनांक 04/04/2024 रोजी मान्यता दिलेली आहे.

महानगरपालिकेत सद्य:स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 452 अ च्या (1 अ ) तरतुदी नुसार अधिकार मा. आयुक्त्‌ तथा प्रशासक यांना आहेत. त्यानुसार वरिल प्रमाणे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता सादर करण्यात येत आहे.

**ठराव** ४९८ **दिनांक** १५/३/2028

**विषय:- मनपा प्रभाग समिती क्रमांक 5 मंडई, भिवंडी नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. हॉस्पीटल इमारती मध्ये 2 नग उव्दवाहन व्यवस्था करणे.(सुधारित अंदाजपत्रक)**

बी.जी.पी. हास्पीटल इमारतीमध्ये 2 नग लिप-ट बसविणेकामी सन 2023-24 च्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार सदर कामी सी.एस.आर. दर 2022-23 नुसार सुधारित अंदाजपत्रक तयार केले असून त्यानुसार रक्कम रूपये 54,68,592/- एवढया होणाऱ्या खर्चाच्या प्रस्तावावरिल प्र.कार्यकारी अभियंता (विद्युत), शहर अभियंता, मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त्‌ अधिकारी, अतिरीक्त्‌ आयुक्त्‌ यांनी केलेल्या शिफारशी नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडिल शासन

आदेश क्र. एमसीओ 2020/प्रक्र 71(भाग-2)नवि-14, दिनांक 06/06/2022 अन्व्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 452 अ(1अ) तरतुदीनुसार मला प्राप्त् झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त्, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त्**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजने कामी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजने बाबत प्रस्तावाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत १००MLD पाणी पुरवठा योजना राज्यप्रकल्प समन्वय समितीची मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मार्फत शासनाकडे सादर करण्यांत आली असता शासन निर्णय क्रमांक अमृत -२०२२/ प्र.क्र. ३२०/नवि-३३, दि.०७/१२/२०२२ अन्वये अमृत २.० अभियान भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पास रु.४२६.०४ कोटीच्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे. त्यापैकी भिवंडी मनपाचा हिस्सा ३०% प्रमाणे रु. १२७.८१ कोटी इतका आहे.

भिवंडी शहराची भौगोलिक परिस्थिती पहाता कामात येणाऱ्या अडचणी, वाहतुक समस्या व उपरोक्त कामाची निकड लक्षात घेता सदर कामाकरीता प्रथम टप्प्यात स्थापत्य कामाच्या रक्कम रु.३२८.९९ कोटी (G.S.T. वगळून) निवदेतील अंदाजपत्रकीय दरांपेक्षा १२.९०% जास्तीची रक्कम रु.४२,४४,०३,०३२/- मात्र व जी.एस.टी. रु.७,६३,९२,५४६/- मात्र असे एकुण रु.५०,०७,९५,५७८/- मात्रची निविदा मंजुर झालेली आहे. त्याप्रमाणे सदर प्रकल्पाकरीता मनपास स्वहिश्यापोटी एकुण रक्कम रु.१७७.८८ कोटी निधी उभारावा लागणार आहे.

उपरोक्त संदर्भानुसार Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजना राबविण्यात येणार असुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस अपेक्षित निधीची माहिती सादर करणे बाबत कळविण्यांत आलेले आहे. त्याप्रमाणे सदर प्रकल्पाकरीता मनपास स्वहिश्यापोटी एकुण रक्कम रु.१७७.८८ कोटी निधी उभारावा लागणार असुन मनपाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता मनपास इतक्या मोठ्या प्रमाणात योजने करीता स्वहिस्सा उभारणेस अडचण निर्माण होणार आहे. सदर योजना ही महत्वकांक्षी योजना असुन योजना पुर्ण झाले नंतर शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये वाढ होणार असुन त्याच बरोबर महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न देखील वाढणार आहे. त्याकरीता Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजनेत सहभागी होणे गरजेचे आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कर्ज स्वरुपात आवश्यक निधी |
|---|---|---|
| १. | **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजने कामी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजने बाबत प्रस्तावाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.१७७.८८ कोटी** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजने कामी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजने कामी प्रस्तावाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक : ४७८ दिनांक : १४/०३/ २०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजने कामी Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजने बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजने करीता रक्कम रु.१७७.८८ कोटी निधी कर्ज स्वरुपात उपलब्ध करणे करीता Urban Infrastructure Development Fund (UIDF) अंतर्गत कर्ज योजनेत सहभागी होणे कामी मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

प्रस्तावना :-

**विषय :- प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात विद्युत वाहिनी अंथरणेकामी टोरंट पॉवर कंपनीव्दारे खोदण्यांत आलेल्या चरी डांबरीकरण कामाने दुरुस्त करणे.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या **प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात विद्युत वाहिनी अंथरणेकामी टोरंट पॉवर कंपनीव्दारे खोदण्यांत आलेल्या चरी डांबरीकरण कामाने दुरुस्त करणे.** (अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३४,५३,९४८/-) या कामाची बी-१ प्रकारची ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर कामाची निविदा सुचना क्रं. १७८/२०२३-२४ (ऑनलाईन टेंडर क्र. १०१३३३०) वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मागविणेत आली आहे. सदर कामासाठी एकुण दोन ई निविदा प्राप्त झालेल्या असुन, त्यापैकी निम्नतम दराचे निविदाकार **मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांनी दिलेला देकार अंदाजपत्रकीय दराने असुन, त्यानुसार कामाची रक्कम **रु. ३४,५३,९४८/- (GST** सह) येत आहे.

**मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांची प्राकलन दराची ई निविदा रक्कम **रु. ३४,५३,९४८/-** (अक्षरी रु. चौतीस लाख त्रेपन्न हजार नऊशे अठ्ठेचाळीस रुपये मात्र) (GST सह) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसीप्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक १४/०३/२०२४ रोजी पूर्व मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय ठराव मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ४७६ **दिनांक :-** १४/3/२०२४

**प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात विद्युत वाहिनी अंथरणेकामी टोरंट पॉवर कंपनीव्दारे खोदण्यांत आलेल्या चरी डांबरीकरण कामाने दुरुस्त करणे.** कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांची अंदाजपत्रकिय दराची म्हणजेच रक्कम रु. ३४,५३,९४८/- (अक्षरी रु. चौतीस लाख त्रेपन्न हजार नऊशे अठ्ठेचाळीस रुपये मात्र) (**GST** सह) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता,मुख्य लेखापरिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकरी व अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, **प्रभाग समिती क्रं. ०३ कार्यक्षेत्रात विद्युत वाहिनी अंथरणेकामी टोरंट पॉवर कंपनीव्दारे खोदण्यांत आलेल्या चरी डांबरीकरण कामाने दुरुस्त करणे.** याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार **मे. हिंदुस्थान इंटरप्रायजेस, भिवंडी.** यांचे बरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३(क) नुसार संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका